
एकलव्य का प्रकाशन

# रूसी आणि पूसी

एक चित्रकथा



वी. सुतेयेव

# रुसी आणि पूसी

चित्र एवं कहानी

वी. सुतेयेव



एकलव्य

का प्रकाशन

## रूसी आणि पूसी

एक चित्रकथा

**चित्र आणि कहानी : वी. सुतेयेव**

**मराठी अनुवाद : सुधा हर्डीकर**

स्टोरीज़ एण्ड पिक्चर्स की एक चित्रकथा.
प्रगति प्रकाशन, मास्कोच्या सौजन्याने इंग्रजीतून अनुदित आणि प्रकाशित.

मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत शासन आणि
सर रतन टाटा ट्रस्टच्या वित्तीय सहयोगानी प्रकाशित.

जानेवारी, 2002/3000 प्रति
मूल्य रु. 10.00
हे पुस्तक हिन्दी, बंगला आणि इंग्रजीत सुध्दा उपलब्ध आहे.
एकूण 25 000 प्रति.



**प्रकाशक**

**एकलव्य,**

ई–7/453 एच. आई. जी., अरेरा कॉलोनी,
भोपाल – 462 016, म. प्र.
फोन : (0755) 463380, फैक्स : (0755) 461703
ईमेल : eklavyamp@vsnl.com

भंडारी ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल द्वारा मुद्रित।


# रुसी आणि पूसी



एक थी रुसी आणी एक होती पूसी. दोघींची होती गट्टी.





रुसी चित्र काढण्यात गुंग
होती त्यात वेळी पूसी उडी
मारून खुर्चीवर येऊन
बसली.



“तू हे काय करीत आहेस.”
पूसीनं विचारलं.
“मी तुझ्या साठी सुंदरस घर बनवीत आहे.” रुसी म्हणाली.
“हे पहा घराचे छप्पर, हा दरवाजा आणि ही धूरासाठी चिमणी.”







‘‘पण मी घरात जाऊन काय करीन?’’ पूसीनं विचारलं.

‘‘तू आपल्यासाठी चूल बनव आणि त्यावर स्वयंपाक कर.’’ रुसी म्हणाली आणि चित्रात चिमणीतून धूर निघताना दाखविला.




''पण .. पण .. खिडकी कुठे आहे ह्या घराला? मांजर तर खिडकीतूनच उडी मारुन घरात जाते न?'' पूसीन थोडा आवाज चढवून म्हणाली.

''ह्या पहा, एक.. दो.. तीन.. चार.. '' रुसीन चित्रात भराभर खिडक्या काढून दाखविल्या.


''पण मला फिरायला जागा कुठे आहे?'' पूसील लाडवत विचारलं.





''ही पहा!'' अन रुसीन
झटपट घराच्या चारही बाजूला
कुंपण काढलं. आणि ती
म्हणाली, आणि हा पहा
बगीचा!''
पूसीन चित्रा कडे डोळे वटाकून
पाहिलं आणि म्हणाली।
एवढासा बगीचा? आणि इथे
झाड-फुल सुद्धा नाहीत.''





‘‘अग थांब, तिकी घाई करु नकोस.’’ रुसी म्हणाली. ‘‘ही पहा फुलझाड, हे पेरुचं झाड, ही गाजरं आणि ही फूलकोबी.’’



‘‘फूलकोबी ....! पूसीन तोड वाकड करत विचारलं.’’ आणि मी मासळया धरायला कुठे जाईन?’’



‘‘हे पहा इथं.’’ अन रुसीन चित्रात एक छोट तळ काढलं त्यांत तीन मासे पण होते. पूसी खुश झाली. मासे पाहून तिच्या तोंडला पाणी सुटलं. वाह कित्ती छान ...! पण इथं पाखरं पडताना तर दिसत नाहीयेत. मला पाखरांची शिकार पण आवडते. पूसी म्हणाली.





''अरे! मी तर विसरलेच.'' रुसी म्हणाली आणि तिने चित्रात कोंबडा, कोबडी त्याची तीन पिल्लं आणि एक बदक सुद्धा बनवलं.

पूसीन आपले पंजे चाटले आणि डोळे मिचकावून मिश्कलपणे विचारलं, ''ह्या घरात उंदीरमामा तर असेलच ना?''







आता मात्र रुसीचा पारा
चढला. तिन दरडावून
सांगितलं की या घरात उंदीर
सापडणार नाहीत.
''मग माझ्या घराचे रक्षण
कोण करणार?'' पूसीन
आवाज चढवून विचारलं.
रुसीन लवकर लवकर चित्रात
काहीतरी बनवलं आणि
म्हणाली, ''हा पहा. हा कुत्रा तुझ्या घराचे रक्षण करेल.''

कुत्र्याचं नाव ऐकताच पूसी फणफणून उठली. तिन आपल्या पाठीची कमान केली, शेपटी ऊंचावली, मिशा विस्फरल्या, अणकूचीदार दांत दाखविले आणि पंजानं पाती उखरत म्हणाली. ''मला नाही आवडलं तुझ हे घर, मी नाही रहणार या घरात.''

पूसीचा जणू'मूड ऑफ' झाला. ती रागावून तेथून निघून गेली. अता तुम्हीच सांगा कशी समजूत घालायची पूसीची?





मूल्य रु. 10.00